**प्रेस नोट** **दिनांक २०/०४/२०१९**

## चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आले बाबत.

चंदननगर पो.स्टे. गुर.नं. ४८/२०१९, भा.द.वि. कलम ३७९ मधील रिक्षा ही चोरीस गेली होती. सदर गुन्हयाचा तपास वपोनि. कृष्णा इंदलकर व पोनि. गुन्हे राजेंद्र काळे यांचे सुचनांप्रमाणे चालु असतांना आरोपी नामे गणेश मधुकर जाधव, वय ३३ वर्षे, रा. उमरगा, जि. उस्मानाबाद. सध्या- वाघोली पुणे हा संशयीतरित्या वडगावशेरी, पुणे येथे इमारतीचे पार्कीगमध्ये वाहनांची टेहळणी करीत असतांना मिळुन आलेला होता. सदर आरोपीस पोउनि. श्रीधर भोसले, पोहवा. रविंद्र रोकडे, पोहवा. पंडीत गावडे, पोना. अमोल गायकवाड, पोशि. परशुराम शिरसाठ, पोशि. संदिप येळे यांनी ताब्यात घेवुन त्याचेकडे या गुन्हयासंबधाने तपास करता त्याने या गुन्हयामधील रिक्षा चोरलेची कबुली दिली. तसेच त्याने येरवडा पो.स्टे. चा मोटार सायकलचा एक गुन्हा व लोणीकंद पो.स्टे. चे मोटार सायकलचे दोन गुन्हे याप्रमाणे ४ गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यास अटक करुन त्याचेकडुन खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणुन रिक्षा व मोटारसायकल हस्तगत झालेल्या आहेत.

१) येरवडा पो.स्टे.गु.रजि नं ४३०/२०१७ मध्ये चोरीस गेलेली पल्सर मोटार सायकल

२) लोणीकंद पो.स्टे. गु.रजि.६७९/२०१८ भा.द.वि.कलम ३७९ मध्ये चोरीस गेलेली स्प्लेंन्डर प्लस

३) लोणीकंद पो.स्टे. गु.रजि. ३३४/२०१९ भा.द.वि.कलम ३७९ मध्ये चोरीस गेलेली होन्डा शाईन

४) चंदननगर पो.स्टे. गुर.नं. ४८/२०१९ भा.द.वि.कलम ३७९ मधील रिक्षा

सदरची चांगली कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग श्री. सुनिल फुलारी सो, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४, श्री. प्रसाद अक्कानवरू सो, मा. सहा पोलीस आयुक्त, येरवडा विभाग डॉ. श्री. शिवाजी पवार सो. यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. कृष्णा इंदलकर, पो.नि.गुन्हे राजेंद्र काळे, पोउनि. श्रीधर भोसले, पोहवा. रविंद्र रोकडे, पोहवा. पंडीत गावडे, पोना. अमोल गायकवाड, पोशि. परशुराम शिरसाठ, पोशि. संदिप येळे यांनी केली आहे.